॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२३-२४/४३९०　　　　　　　　दिनांक : ३०/०३/२०२४

## अत्यंत महत्वाचे
## (सहकेंद्रप्रमुख (JCS) नियुक्त बाबत)

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषयः प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ परीक्षेसाठी महाविद्यालयीनस्तरावर सहकेंद्रप्रमुख (JCS) नियुक्त करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०२/०४/२०२४ पासून पदवी व दिनांक १६/०४/२०२४ पासून पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सर्व संलग्नित महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर होणार आहेत हे आपणास ज्ञान आहेच !

सदर परीक्षेसाठी विद्यापीठाव्दारे सहकेंद्रप्रमुखाची नियुक्ती करण्यात आलेली आहे, परंतु काही कारणास्तव सहकेंद्रप्रमुख परीक्षा केंद्रावर वेळेवर हजर न झाल्यास परीक्षा केंद्राची गैरसोय होवू नये म्हणून प्राचार्यानी आपल्या महाविद्यलयातील वरिष्ठ शिक्षकांची सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करावी आणि परीक्षा सुरळीतपणे घेण्यात याव्या. नियुक्त केलेल्या शिक्षकांचे नाव, मोबाईल नंबर, इमेल इत्यादी माहिती विद्यापीठाच्या srtmuncoordinationsection@gmail.com या इमेलवर पाठविण्यात यावी. सदर नियुक्ती ही विद्यापीठाकडून सहकेंद्रप्रमुख नियुक्त होईपर्यंत किंवा विद्यापीठाकडून पुढील आदेश येईपर्यंत राहील.

सबब, परीक्षा केंद्रावर विद्यापीठाव्दारे सहकेद्रप्रमुखाची नियुक्ती झालेली नाही अथवा नियुक्ती आहे पण रुजू झालेले नाहीत अशाच महाविद्यालच्या परीक्षा केंद्रावर आपल्या महाविद्यालयातील कायम शिक्षकाची सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती/आदेश द्यावेत व त्यांच्या उपस्थितीमध्ये परीक्षेसंबंधीची सर्व कार्यवाही करण्यात यावी. सदर नियुक्त केलेला सहकेंद्रप्रमुख हा विद्यापीठाचा प्रतिनीधी म्हणून ग्राहय धरण्यात यावा, जेणे करून उन्हाळी-२०२४ परीक्षा कॉपीमुक्त, पारदर्शी व सुरळीत पार पाडणेसाठी मदत होईल. ज्यांची सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती केलेली आहे त्यांची सविस्तर माहिती परीक्षा विभागाकडे पाठविण्यात यावी, ही विनंती.

टिपः महाविद्यालयस्तरावर नियुक्त केलेल्या सहकेंद्रप्रमुखाचे मानधन विद्यापीठ नियमानुसार देय राहील.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ